**प्रकल्प प्रवर्तक मे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, महाराष्ट्र यांचा भारतमाला परियोजना अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर- सोलापूर- अक्कलकोट -महाराष्ट्र / कर्नाटका सीमावर्ती भागातून प्रस्तावित सहा पदरी ग्रीनफिल्ड महामार्ग विकास करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, महाराष्ट्र यांचा भारतमाला परियोजना अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर-सोलापूर-अक्कलकोट-महाराष्ट्र/कर्नाटक सीमावर्ती भागातून प्रस्तावित सहा पदरी ग्रीनफिल्ड महामार्ग विकास करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बुधवार, दिनांक १० जानेवारी, २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, सात रस्ता, सोलापूर येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री. निखील मोरे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री. दादासाहेब कांबळे, अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. प्रशांत गायकवाड, प्रतिनिधी, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती,प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, महाराष्ट्र यांचा त्यांच्या भारतमाला परियोजना अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर-सोलापूर-अक्कलकोट-महाराष्ट्र/कर्नाटक सीमावर्ती भागातून प्रस्तावित सहा पदरी ग्रीनफिल्ड महामार्ग विकास करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ नुसार सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज सांदर केला होता व त्यास अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक १७-०५-२०२३ रोजी प्रदान केली.

जिल्हाधिकारी, सोलापूर, यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास बुधवार, दिनांक १० जानेवारी, २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- 92 / २०२३ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-231221-FTS-0121

दिनांक 21/12/2023 अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, सोलापूर, किंवा त्यांचे प्रतिनिधी (अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| **२)** महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे जिल्हा – पुणे, | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर | - | **आयोजक** |

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांनी जनसुनावणी ३० दिवसाच्या अगोदर स्थानिक दैनिक संचार यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र दिव्य मराठी यात इंग्रजीत जनसुनावणीबाबत जाहिर सूचना दिनांक १०-१२-२०२३ रोजी प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते -

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर,

२) जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, सोलापूर,

५) तहसीलदार, तहसील कार्यालय-बार्शी, तालुका- बार्शी , जिल्हा- सोलापूर,

६) गट विकास अधिकारी, पंचायत समिती- बार्शी, तालुका- बार्शी, जिल्हा- सोलापूर,

७) तहसीलदार, तहसील कार्यालय-दक्षिण सोलापूर, तालुका- दक्षिण सोलापूर, जिल्हा- सोलापूर,

८) गट विकास अधिकारी, पंचायत समिती- दक्षिण सोलापूर, तालुका- दक्षिण सोलापूर, जिल्हा- सोलापूर,

९) तहसीलदार, तहसील कार्यालय-अक्कलकोट, तालुका- अक्कलकोट, जिल्हा- सोलापूर,

१०) गट विकास अधिकारी, पंचायत समिती अक्कलकोट, तालुका- अक्कलकोट, जिल्हा- सोलापूर,

११) मौजे - नागोबाची वाडी, लक्ष्याची वाडी, अलिपूर, कासारवाडी, बळेवाडी, कव्हे, दडशिंगे, पानगाव, काळेगाव, घाणेगाव, मानेगाव, वैराग, सासुरे, सर्जापूर, रातंजन, हिंगणी (आर) या गावांशी संबंधित ग्रामपंचायत कार्यालये, तालुका-बार्शी, जिल्हा-सोलापूर,

१२) मौजे - तांदूळवाडी, मुस्ती, धोत्री, तीर्थ या गावांशी संबंधित ग्रामपंचायत कार्यालये, तालुका-दक्षिण सोलापूर, जिल्हा-सोलापूर

१३) मौजे - बोरेगाव, डोंबरजवळगे, चपळगाव, चपळगाव वाडी, दहिटणे वाडी, कोन्हाळी, हसापूर, नागणहळ्ळी या गावांशी संबंधित ग्रामपंचायत कार्यालये, तालुका- अकक्लकोट, जिल्हा-सोलापूर

१४) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

१५) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) - मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

१६) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जोग सेंटर, ३रा मजला, वाकडेवाडी, जुना पुणे-मुंबई रस्ता, पुणे - ४११ ००३,

१७) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ब/४, बाळी बिल्डिंग, सिव्हील लाईन्स, शासकीय दूध डेअरी समोर, सात रस्ता, सोलापूर - ४१३ ००३

१८) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांना प्राप्त सूचना/आक्षेप, सादरीकरणाची प्रत व सीडी, माळढोक अभयारण्यातील पक्षी आणि इतर वन्यजीव याबाबतचे फिल्ड गाईड बुक तसेच संबंधित प्राप्त कागदपत्रे इतिवृत्तासोबत जोडण्यात येत आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

अध्यक्ष यांनी सांगितले की पर्यावरणविषयक जनसुनावणी आहे. त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्याची सूचना केली.

त्यावेळी -

१) **<u>श्री पंकज प्रकाश चिंदरकर</u>** यांनी सांगितले की या बैठकीच्या अनुषंगाने काही मार्गदर्शक सूचना करण्यात आलेल्या होत्या, त्याप्रमाणे आम्ही निवेदन सादर करत आहोत. त्यांनी त्यांचे निवेदन पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना निवेदन सादर केले. त्यांनी सांगितले की आजपासून सोलापूर जिल्हयातील जत्रा चालू आहे. या प्रकल्पामुळे बाधित गावातील बरीच कुटुंबे हे त्यांच्या परंपरागत धार्मिक पुजाविधीत गुंतलेले आहेत. त्यामुळे बैठकीचा जो उद्देश आहे की येथील बाधितांनी येऊन सूचना, आक्षेप प्रस्तावित प्रकल्पाविषयी नोंदवावेत हा उद्देश साध्य होणार नाही. तरी ही जनसुनावणी स्थगित करण्यात येऊन नंतर ही जनसुनावणी पुढील योग्य त्या तारखेस घ्यावी ही आमची मागणी आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी ही बैठक स्थगित करण्यात येणार नाही, मात्र आपण उपस्थित केलेल्या सूचनेची नोंद घेण्यात आल्याचे सांगितले.

२) **<u>श्री बाळासाहेब पांडुरंग मोरे, अध्यक्ष, ग्रीनफिल्ड हायवे संघर्ष समितीः-</u>**

आमचा आक्षेप या बैठकीस आहे की निवाडा होण्याअगोदर ही बैठक आयोजित करणे योग्य होते. निवाडा झाल्यानंतर पर्यावरणाची बैठक बोलाविणे हे कायदेशीररित्या मला योग्य वाटत नाही. याबाबत आमचा आक्षेप नोंदवावा.

त्यावेळी आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रथम सर्वांना सादरीकरण पूर्ण पाहून घ्यावे. नंतरच पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीसमोर आपण आपले आक्षेप, विचार नोंदविण्यात यावेत.

त्यावेळी श्री पंकज प्रकाश चिंदरकर यांनी आक्षेप नोंदविला की सादरीकरणाच्या अगोदरचाच हा विषय असल्याने आक्षेप नोंदविण्यात आलेला आहे. त्यांनी

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतची जाहीर सूचना निर्देशांप्रमाणे प्रकाशित केली नसल्याचा आक्षेप नोंदविला. श्री चिंदरकर यांनी आक्षेप नोंदविला की एकाच वृत्तपत्रात मराठी व इंग्रजी जाहिरात प्रसिध्द करणे आवश्यक होते, मात्र येथे मराठी एका वृत्तपत्रात, तर इंग्रजी दुस-या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेले आहे. त्यावेळी आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की अधिसूचनेनुसार स्थानिक वृत्तपत्रात शासनाच्या राजभाषेत येथे मराठीत जनतेसाठी जाहिर सूचना प्रकाशित करणे बंधनकारक आहे. त्यानुसार ती प्रकाशित करण्यात आली.

**श्री पंकज प्रकाश चिंदरकर** यांनी आक्षेप नोंदविला की जो कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध करण्यात आला, त्यातील टेबल्स आणि नकाशे हे इंग्रजीत आहेत. ते सर्वसामान्य माणसांना समजणे कठिण आहे. ही पहिली हरकत आहे. कारण सर्व कार्यकारी सारांश अहवाल हा पूर्णपणे मराठीतच असणे अपेक्षित आहे. त्यांनी आक्षेप नोंदविला की २००६ च्या अधिसूचनेनुसार कार्यकार सारांश अहवाल हा त्या राज्याच्या राजभाषेत हवा. त्यांनी सांगितले की याबाबत उत्कर्ष मंडळ विरुध्द युनियन ऑफ इंडिया याबाबत दिल्ली हायकोर्टाचे आदेश आहेत. ही जबाबदारी अर्जदार म्हणजे येथे प्रकल्प प्रवर्तक यांची आहे. येथे तरतुदींचे पालन झालेले नाहीत. तसेच जो अहवाल मराठीत केलेला आहे, ते मराठी गुगल भाषातंर आहे की ते मराठी सर्वांनाच कळतच नाही.

त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की अहवाल हा मराठीत केलेला असून टेबल्समधील आकडे हे जरी इंग्रजीत आहेत, तरी ते वाचून सर्वांनाच समजतात.

**श्री पंकज प्रकाश चिंदरकर** यांनी आक्षेप नोंदविला की सामान्य माणसाला पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल समजणे अपेक्षित आहे. अहवालाल longitude व latitude, terrain लिहिलेले आहे. हे सामान्य माणसांना समजणारच नाही. तर ते हरकती, सूचना काय मांडणार?

**आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सांगितले की सादरीकरण हे संपूर्ण मराठीतच दाखविण्यात येणार आहे.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सांगितले की सदरहू सूचनेची नोंद घेण्यात येत आहे. आयोजक यांनी बैठकीच्या सुरवातीसच सांगितलेले आहे की ही समिती कुठलाही निर्णय घेत नाही, प्रकल्प मंजूर करत नाही, प्रकल्पाची शिफारस करत नाही, प्रकल्र नाकारत नाही. आपल्या सर्व सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठीच ही समिती गठित करण्यात आलेली आहे. तरी सदरहू बैठकीच्या पध्दतीप्रमाणे प्रथम सादरीकरण पूर्ण करण्यात येऊ द्यावे.

**श्री बाळासाहेब पांडुरंग मोरे, अध्यक्ष, सुरत-चेन्नाई ग्रीनफिल्ड हायवे संघर्ष समिती** यांनी परत प्रतिपादन केले की ही बैठक निवाडा होण्याअगोदरच आयोजित करणे अपेक्षित होते. म्हणजे येथे कार्योत्तर मान्यता घेणे असाच होत आहे.

**यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी** सांगितले की निवाडा म्हणजे भूसंपादन आणि पर्यावरण हे दोन्ही विषय वेगळे आहेत. कारण दोन्ही कायदे हे वेगळे आहेत.

**श्री पंकज प्रकाश चिंदरकर** यांनी मत मांडले की जमिन अधिग्रहण करतानाच त्याचे पर्यावरण मुल्यांकन होणे गरजेचे आहे. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सदरहू सूचनेची नोंद घेण्यात येत आहे.

**श्री पंकज प्रकाश चिंदरकर** यांनी आक्षेप नोंदविला की पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार तीस दिवस अगोदर सर्व पर्यावरणीय दस्तावेज हा अधिसूचित शासकीय कार्यालयात जनतेच्या अवलोकनार्थ ३० दिवसाच्या अगोदर उपलब्ध करणे बंधनकारक आहे. सोलापूर स्थानिक म.प्र.नि. मंडळ कार्यालयाने रविवार १० डिसेंबर, २०२३ रोजी स्थानिक वृत्तपत्रात जनसुनावणीबाबत जाहिर सूचना प्रकाशित केली, मात्र अहवालांवर जावक तारीख ही सोमवार, ११ डिसेंबर ही आहे. तसेच अधिसूचित शासकीय कार्यालयांनी ते निर्देश पाळले का, स्थानिक ग्रामस्थ, प्रकल्प बाधित यांना अहवाल उपलब्ध केला का याबाबत काहीही माहिती येथे उपलब्ध करण्यात आलेली नाही.

**श्री पंकज प्रकाश चिंदरकर** यांनी पुढे सांगितले की त्यांनी स्वतः उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांनी पत्र सादर केलेले आहे की मला पर्यावरण अहवालाचा दस्तावेज अभ्यासासाठी उपलब्ध करुन देण्यात यावा.

त्यावेळी सदरहू अहवाल हा मप्रनि मंडळाच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्याची सूचना करण्यात आली. सामान्य माणूस जो डाऊनलोड करु शकत नाही, त्याने काय करावे?

**त्यावेळी प्रतिनिधी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ चे सर्व निर्देश पाळण्यात आलेले आहेत. शासकीय अधिसूचित कार्यालयात, प्रकल्प बाधित ग्रामपंचायत कार्यालयात ते जनतेच्या अवलोकनार्थ, अभ्यासासाठी उपलब्ध करण्यात आलेले होते. तेथे ग्रामस्थांनी जाऊन टिप्पणी काढून बैठकीत सूचना वा आक्षेप नोंदविणे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे ग्रामस्थ आजपर्यंत ईमेलव्दारे, लेखी किंवा प्रत्यक्ष सूचना, आक्षेप नोंदवू शकतात. श्री चिंदरकर यांनी सांगितले तो पर्यावरण दस्तावेज हा ग्रामपंचायत कार्यालयानेही वेळेत उपलब्ध केलेला नाही.

**श्री बाळासाहेब पांडुरंग मोरे, अध्यक्ष, सुरत-चेन्नाई ग्रीनफिल्ड हायवे संघर्ष समिती** यांनी येते मत मांडले की येथे भूसंपादन अधिका-यांना बोलविणे अपेक्षित होते. त्यावेळी अध्यक्ष यांनी सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ व सुधारित २००९ नुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सदस्य सचिव यांनी ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलेली असून जिल्हादंडाधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी हे बैठकीचे अध्यक्ष असतात. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी हे सदस्य असतात, तर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या स्थानिक उप प्रादेशिक अधिकारी हे बैठकीचे आयोजक असतात. प्रस्तावित प्रकल्पामुळे होणा-या संभाव्य पर्यावरणीय परिणामाबाबत बाधित ग्रामस्थांच्या सूचना, आक्षेप नोंदविणे हे या समितीचे काम असते. त्याची इतिवृतात नोंद घेऊन ते शासनास सादर करण्यात येतात, तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेते.

त्यावेळी **श्री बाळासाहेब पांडुरंग मोरे, अध्यक्ष, सुरत-चेन्नाई ग्रीनफिल्ड हायवे संघर्ष समिती** यांनी आक्षेप नोंदविला की निवाड्याबाबत आक्षेप नोंदविताना स्थानिक शेतक-यांनी झाडांचे मुल्यांकन, विहिरीचे मुल्यांकन याबाबत आक्षेप नोंदविले, त्याचा काहीही फायदा झाला नाही. तर येथेही आक्षेप नोंदवून काय फायदा होणार?

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सांगितले की जनसुनावणी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आहे. येथे प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावर जो आघात होईल, त्याबाबत सूचना, आक्षेप नोंदविता येतील, त्यामुळे इतर विभागातील अधिका-यांचा या समितीत समावेश करता येत नाही. त्यावेळी उपस्थितांनी आमच्या आक्षेपांची नोंद घेण्यात येण्याची मागणी केली.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित केलेल्या सर्व सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात येऊन त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येऊन शासनास सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी जनसुनावणीच्या कार्यवाहीबाबत उपस्थितांचे आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले. त्यानंतर सादरीकरण सुरु करण्यात येईल अशी सूचना केली.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी येथे प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याची सूचना केली प्रथम सादरीकरण पूर्ण करण्यात यावे.

**प्रकल्पाचे सल्लागार यांनी** प्रकल्पाचे सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, महाराष्ट्र यांचा भारतमाला परियोजना अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर-सोलापूर-अक्कलकोट-महाराष्ट्र /कर्नाटक सीमावर्ती भागातून प्रस्तावित सहा पदरी ग्रीनफिल्ड महामार्ग विकास संदर्भात ही पर्यावरणविषयक जनसुनावणी आहे. या प्रकल्पामुळे सोलापूर जिल्ह्यातील ३१ गावे बाधित होतील. हा प्रकल्प १.८ कि.मी. लांबीच्या वनक्षेत्रातून जात आहे. कुठल्याही राखीव राष्ट्रीय वन उद्यान वनक्षेत्रातून जात नाही.

**श्री चिंदरकर** यांनी ही नोंद घेण्याची सूचना केली.

त्यावेळी **अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सांगितले की प्रथम सादरीकरण पूर्ण करुन द्यावे व नंतर सूचना, आक्षेप नोंदविण्यात याव्यात.

**पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले** की सोलापूर जिल्हयातून ७६ कि.मी. हा प्रकल्प जातो. महामार्गाची रुंदी ही ६० मीटर ठेवलेली आहे. टोल प्लाझा चार आहेत. स्थानिकांना त्रास होऊ नये म्हणून हॉट मिक्स प्लँट हा शहरापासून लांब ठेवलेला आहे. निवासी भागात बांधकाम करण्यास रात्री १०.०० ते सकाळी ०६.०० वाजेपर्यंत बंद ठेवण्यात येईल. प्रकल्पासाठी ९,७९५ वृक्षतोड ही करावी लागेल. मात्र प्रकल्पात वृक्षारोपण करण्यात येणार आहे. प्रस्तावित महामार्ग हा १०.४ हेक्टर राखीव जंगलातून जात आहे. खड्ड्यांचे पुनर्भरण करण्यात येईल. सोलापूर जिल्हयातील ३,५७३ पीएपी ६१४ हेक्टर एवढे भूसंपादन आहे. त्यांना भरपाई प्रक्रिया चालू आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला ८८,००० झाडे लावणार आहोत. प्रकल्पाती फ्लाय एश ही एनटीपीसी, सोलापूर व परळी यांचेकडुन उपलब्ध होणार आहे. प्रकल्पात रेन वॉटर हार्व्हेस्टींग प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

त्यांनी सदरहू प्रकल्पाचे सामाजिक फायदे सविस्तर सांगितले.

सादरीकरण झाल्यानंतर **आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सांगितले की पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीने उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. सूचना, आक्षेप पर्यावरणावरच विचारावे ही सूचना केली. त्याअगोदर आपले संपूर्ण नांव, संस्थेचे नांव सांगावे.

**<u>उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-</u>**

**१) <u>श्री पंकज प्रकाश चिंदरकर, अध्यक्ष, जीआडी फाऊन्डेशन, सोलापूरः-</u>**

सादरीकरणात जी मराठी आकडेवारी असलेली टेबल्स आहेत, ती आकडेवारी लोकांना अवलोकनार्थ उपलब्ध केलेल्या ईआयए अहवालातील आकडेवारीपेक्षा वेगळी आहेत. प्रकल्पाचा सारांश आणि सादरीकरण हे वेगळे असून सादरीकरणात दिशाभूल माहिती दिलेली आहे. प्रकल्पाचा सारांश आणि सादरीकरण यात पूर्णपणे भिन्नता

आहे. आपण जे सर्वेक्षण केले, तर त्यात बॉयलॉजिकल सर्वेक्षण झालेले आहे काय? झाला असल्यास हो वा नाही सांगावे.

प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की बॉयलॉजिकल सर्वेक्षण झालेले आहे. श्री चिंदरकर यांनी पुढील प्रश्न विचारला की ज्यांनी प्रत्यक्ष सर्वेक्षण केले, ती समिती येथे उपस्थित आहे काय? आपण सर्वेक्षण करताना जो कच्चा मसुदा (raw data) आहे, तो समितीसमोर सादर करणार का?

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की मागणी केल्यास तो उपलब्ध करण्यात येईल. त्यावेळी श्री चिंदरकर यांनी मागणी केली तो कच्चा मसुदा (raw data) पर्यावरणविषयक समितीसमोर सादर करावा.

**प्रतिनिधी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी मत मांडले की संपूर्ण पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआयए) अहवाल तयार आहे, तो उपलब्ध करण्यात आलेला आहे. मात्र जर श्री चिंदरकर यांना कच्चा मसुदा (raw data) पाहिजे असल्यास तो उपलब्ध करुन देण्यात यावा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी याबाबत विशिष्ट मागणी (specific requirement) असल्यास ती सांगण्याची सूचना केली. त्यावेळी श्री चिंदरकर यांनी आक्षेप नोंदविला की प्रकल्प प्रवर्तकांनी संबंधित शासकीय विभागांची तो डेटा प्रकाशित करताना/ईआयए अहवालात नोंदविताना पूर्व परवानगी घेतलेली नाही, जी बंधनकारक आहे. म्हणजे नागरी क्षेत्रात प्रवेश करणार असाल, तर त्या शासकीय सक्षम विभागाची (Competent-Authority), वन विभाग असल्यास त्या सक्षम विभागाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे, जैविक सर्वेक्षण करावयाचे असल्यास जैविक मंडळाची पूर्व परवानगी आवश्यक आहे. याबद्दल माहिती प्रकल्प प्रवर्तकांना आहे काय?

त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की National High Way Act, 1956 - Section 3A घोषित केल्यानंतर आम्हांला त्या भागात सर्वेक्षण करण्याचा अधिकार प्राप्त होतो. श्री चिंदरकर यांनी आक्षेप नोंदविला की जैविक विविधता अधिनियम, २००२ नुसार कलम ७ नुसार त्यांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक होते. तरीही Bio-Diversity Board, Maharashtra State यांच्या परवानगीशिवाय आपण तेथून नमुने (सॅम्पल्स) घेतलेले आहेत.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की आम्ही त्यांना सूचना दिलेले आहे. नंतरच सर्वेक्षण करण्यात आले.

**श्री चिंदरकर** यांनी सांगितले की आपण जैविक विविधता अधिनियम, २००२ नुसार कलम ७ नुसार परवानगी घेतली असल्यास ती पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीसमोर सादर करण्यात यावी.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अंतर्गतच Bio-Diversity Board असून पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय आम्हांला टीओआर प्रदान करत असते. त्याशिवाय आम्ही सर्वेक्षणाबाबत माहिती देत असतो.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी आदेश दिले की लेखी परवानगी घेतली असेल तर त्याचा पुरावा द्यावा, नसल्यास तसे सांगून पुढील प्रश्न घेण्यात यावा. श्री चिंदरकर यांनी परत सांगितले की माझे तीन प्रश्न आहेत - बायोलॉजिकल सर्वेक्षण केले का, बायोलॉजिकल सॅम्पल्स गोळा केली का व त्याचा अहवाल प्रसिध्द केला का हे तीन प्रश्न आहेत. त्यासाठी पूर्व लेखी परवानगी Bio-Diversity Board, Maharashtra State घेतली असल्यास ती सादर करण्यात यावी.

जर घेतली नसेल तर नाही सांगावे, असल्यास आजच ती माहिती समितीस सादर करण्यात यावी, कारण बैठकीची कार्यवाही आज संपणार आहे.

**श्री चिंदरकर** यांनी आक्षेप नोंदविला की नॅशनल हाय वे यांनी जी आरव्ही संस्था नियुक्त केली, त्यांनी जैविक विविधता संसाधन क्षेत्रात प्रवेश केला, तेथील बायोलॉजिकल सॅम्पल्स गोळा केली, त्याचा उपयोग यांना वाणिज्यीक वापर - Commercial Use – करणार आहेत. हा जो डेटा गोळा करण्यात आला, तो गोपनीय डेटा आहे. तो त्यांनी प्रकाशित केला. जैववैविधता अधिनियम, २००२ प्रमाणे तो अपराध आहे. ही संस्था हैद्राबादची असून महाराष्ट्राच्या बाहेर आहे. नमुने विश्लेषण करण्यासाठी हैद्राबादला नेले. राज्याबाहेर नेण्यासाठी संबंधित प्राधिकारी विभागाची परवानगी घेतलेली नाही. तो डेटा सार्वजनिक संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात

आलेला आहे. तो गैरवापर करण्याचा त्यांचा इरादा दिसतो हे मी जिल्हादंडाधिकारी यांच्या समोर आरोप करत आहे.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी लेखी परवानगी असल्यास ती सादर करावी, नसल्यास तसे सांगावे अशी सूचना केली.

येथे प्रकल्प प्रवर्तक यांनी आक्षेप नोंदविला की श्री चिंदरकर सांगतात ही माहिती व्यावसायिक कारणांसाठी वापरली. मात्र सदरहू प्रकल्प हा केंद्र सरकारचा आहे. श्री चिंदरकर यांनी सांगितले शासकीय गॅझेटप्रमाणे मी बोलत आहे.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सांगितले की उपस्थितांनी पर्यावरणविषयक प्रश्न विचारावेत व त्यास प्रकल्प प्रवर्तक आणि पर्यावरण सल्लागार हे उत्तरे देतील. त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की लोकांच्या सेवा व गरजेसाठी हायवे प्रकल्प होत आहे. त्यामुळे सदरहू माहिती ती व्यावसायिक फायद्यासाठी वापरली असे होत नाही. हा शासनाचा लोकांसाठीचा प्रकल्प आहे. श्री चिंदरकर यांनी येथे प्रतिपादन केले की शासकीय गॅझेटनुसार मी आरोप, आक्षेप नोंदवित आहे.

येथे **आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी आवाहन केले की आपल्या सूचना, आक्षेप हे मुद्देसुद मांडण्यात यावेत.

त्यावेळी **श्री चिंदरकर व इतर उपस्थित यांनी** प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार यांनी परवानगी घेतली किंवा नाही याचे उत्तर द्यावे अशी मागणी केली.

**प्रकल्प प्रवर्तक** यांनी सांगितले की भारत सरकारने प्रदान केलेल्या टीओआरप्रमाणे अभ्यास करण्यात आलेला आहे. त्यावेळी श्री चिंदरकर यांनी आक्षेन नोंदविला की प्रकल्प प्रवर्तक दिशाभूल करत आहेत. त्यांनी शासकीय गॅझेट वाचून दाखविले. त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की ही सूचना जे संशोधन करणा-या संस्था असतात, त्यांच्यासाठी आहे. येथे टीओआरप्रमाणे आम्हांला अधिकार आहे. आम्ही जैविक मंडळास कळविलेले आहे.

**श्री चिंदरकर** यांनी आक्षेप नोंदविला की जैववैविधता नियम, २००२ नुसार व महाराष्ट्र जैववैविधता नियम, २००८ नुसार पूर्वपरवानगी घेतलेली आहे का या प्रश्नास

ते उत्तर न देता दिशाभूल करत आहेत. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सदरहू प्रकल्प हा केंद्र सरकारचा आहे. हे आम्हांला लागू (applicable) नाही. त्यावेळी सर्व उपस्थितांनी उत्तर हो का नाही यामध्ये देण्याची मागणी केली.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सांगितले की उत्तर स्पष्टपणे देण्यात यावे. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की आम्ही एन.एच. अधिनियमानुसार काम करतो. उपस्थितांनी प्रकल्प प्रवर्तक यांनी पूर्वपरवानगी घेतलेली नाही असाच अर्थ होतो असा आक्षेप नोंदविला. श्री चिंदरकर यांनी सांगितले की तुम्ही हो का नाही सांगा. कारण त्यासाठी फी आणि फॉर्म भरावा लागतो हे सांगण्याची गरज नाही. त्यासाठी जैव विविधता समितीस समोर यावे लागते, त्यास जैव वैविधता समितीस ठराव मंजूर करावा लागतो. स्पष्टपणे उत्तर देण्यात यावे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की आम्ही जैव वैविधता विभागाची पूर्व परवानगी घेतलेली नाही. अध्यक्ष यांनी याची इतिवृतात नोंद घेण्यात येणार असल्याचे सांगितले.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की आम्ही पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार भारत सरकारने प्रकल्पास मंजूर केलेल्या टीओआर निर्देशांप्रमाणे सर्वेक्षण केलेले आहे.

**श्री चिंदरकर यांनी** पुढे आक्षेप नोंदविला की पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआयए) अहवाल ही राज्याच्या राजभाषेत उपलब्ध केलेला नाही.

**श्री चिंदरकर यांनी** पुढे आक्षेप नोंदविला की प्रकल्प सारांशमध्ये टीओआरचे मुद्दे घेण्यात आलेले आहेत काय? त्यांनी सांगितले की टीओआर ही कार्यकारी सारांश अहवालासोबत जोडले आहेत काय? ईआयए अहवालातील Introduction स्क्रीनवर दाखविण्याची सूचना श्री चिंदरकर यांनी केली. त्यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी एकत्रित आक्षेप नोंदविला की प्रकल्प प्रवर्तकांनी काहीही केलेले नाही, फक्त अहवालात सर्व बाबी लिहिलेल्या आहेत. त्यांनी आक्षेप नोंदविला पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, कार्यकारी सारांश अहवाल ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामस्थांना उपलब्ध केलेला नाही. चेतन संजय जाधव (पेठणेवाडी), मुकुंद शंकर राबाडे (ढाणेगाव, ता. बार्शी),

मारुती विश्वनाथ (बार्शी) व इतर काही लोक यांनी ग्रामपंचायत व नगरपालिकेकडे अहवाल प्राप्त झाला नसल्याबाबत म्हणणे मांडले.

**श्री चिंदरकर यांनी** आक्षेप नोदविला की भूखंडावर असलेल्या औषधी वनस्पती, वृक्ष यांचा विचार न करता सरसकट बाजारभाव ठरवून जमिनीचे अधिग्रहण करण्यात आलेले आहे. त्यांनी परत आक्षेप नोंदविला की अधिसूचित शासकीय कार्यालयात संबंधित जनसुनावणीविषयी माहिती, अहवाल दर्शनी फलकावर प्रदर्शित केलेला नाही. त्याचप्रमाणे कुठलेही कागदपत्र हे महाराष्ट्र राज्याच्या राजभाषेत उपलब्ध करण्यात यावेत.

श्री चिंदरकर व इतर यांनी भारत सरकारने मंजूर केलेला टीओआर स्क्रीनवर दाखविण्याची मागणी केली.

त्यांनी आक्षेप नोंदविला की कार्यकारी सारांश ला पान नं. आय ला उल्लेख आहे की सोबत टीओआर जोडलेला आहे. तो दाखविण्यात यावा. आमचा आक्षेप आहे की कार्यकारी सारांश अहवालात ईएन.१ Introduction मध्ये चार नं. पॅरिग्राफमध्ये ईआयए उपलब्ध करणे आवश्यक आहे असे नमूद केलेले आहे. मात्र बैठकीच्या सभागृहातसुध्दा तो उपलब्ध केलेला नाही.

**अध्यक्ष, पर्यावरण जाहिर जनसुनावणी समिती** यांनी ईआयए आता दाखवता येत असेल तर तो दाखविण्याची सूचना केली. नसेल करता येत तर तसे सांगण्यात यावे.

त्यावेळी **अध्यक्ष, पर्यावरण जाहिर जनसुनावणी समिती** यांनी एनेक्शर - १ हे दाखविण्यात यावे.

**श्री चिंदरकर** यांनी ईआयए आणि ईएमपी स्क्रीनवर दाखविण्याची सूचना केली.

**श्री चिंदरकर** यांनी आक्षेप नोंदविला की जी सीडी ग्रामपंचायत कार्यालयात पाठविण्यात आली, त्या सीडीत अहवालच नाही. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास देण्यात आलेल्या सीडीवरिल अहवाल व येथील अहवाल हा एकच आहे का याबाबत खातरजमा करण्यात यावी.

**श्री चिंदरकर** यांनी आक्षेप नोंदविला की प्रकल्प प्रवर्तकांच्या सल्लागार यांनी जनसुनावणी बैठकीत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, उपस्थित ग्रामस्थ यांच्यासमोर जो अहवाल दाखविला, तो अपूर्ण आहे. ज्या फ़ॉर्मेटमध्ये सादर केले, त्या फॉर्मेटमध्ये अहवाल नव्हता.

**श्री चिंदरकर यांनी** एनेक्चर १ दाखविण्याची सूचना केली.

**अध्यक्ष, पर्यावरण जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सीडीमध्ये यांनी एनेक्चर १ दाखविण्यात यावे अशी प्रकल्प प्रवर्तकांना सूचना केली. ते दाखविता न आल्याची नोंद घेण्याची सूचना अध्यक्ष यांनी केली.

**श्री चिंदरकर** यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तकांनी एनेक्चर १ लावले नाही हे मान्य केलेले आहे.

**श्री चिंदरकर** यांनी टीओआर समजून सांगण्याची सूचना केली.

**अध्यक्ष** यांनीही पर्यावरण सल्लागार यांना टीओआर समजून सांगण्याचे आदेश दिले.

**श्री चिंदरकर** यांनी टिओआरचे अनुपालन (compliance) केलेले स्पष्टीकरण देण्याची सूचना केली.तसेच, Expert Declaration वाचण्यास सांगितले. पर्यावरण सल्लागार राजदीप यांना संपूर्ण अहवालाची जबाबदारी घेण्याची तयारी आहे का याबाबत विचारणा केली. त्यांनी ती मान्य केली.

**पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले की टीओआरनुसार बेस लाईन डेटा सर्वेक्षण होते. टीओआर प्राप्त झाल्यानंतर बेस लाईन सर्वेक्षण करण्यात येते. आता methodology विषयी विचारण्यात आले. तर त्यात जल, हवा, माती/मृदा यांचे सर्वेक्षण करण्यात येते.

**श्री चिंदरकर** यांनी विचारणा केली की सर्वेक्षण कसे करण्यात आले त्याचे स्पष्टीकरण देण्यात यावे. आपण कच्चा मसुदा (raw data) कसा तयार केला, याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी आक्षेप नोंदविण्याची सूचना केली.

**श्री चिंदरकर** यांनी आक्षेप नोंदविला की त्यांनी विविध गावात जाऊन सर्वेक्षण केले असे म्हणतात. तर गावातील किती लोकांनी त्यांना पाहिले आहे? त्यांनी परत विचारणा केली की कोणाच्या शेतात जाऊन सॅम्पल घेतले का, त्याता एक भाग त्या शेतक-यांना दिला व दुसरा ते घेऊन गेले.

**श्री चिंदरकर यांनी** आक्षेप नोंदविला की एकाही शेतात पर्यावरण सल्लागार हे सॅम्पल घेण्यास गेलेले नाहीत. जर तुमच्या शेतातील परस्पर, तुमच्या मंजूरीशिवाय सॅम्पल घेऊन गेले असले तर ते तुम्हांला मान्य आहे का, या प्रश्नास सर्व शेतक-यांनी एकत्रित नकारात्मक उत्तर दिले.

**पर्यावरण सल्लागार यांनी** हवा प्रदूषण सर्वेक्षण पान नं. ५२ बघण्यास सांगितले. **श्री चिंदरकर यांनी** फोटो पाहत असताना विचारणा केली की स्थानिक शेतकरी कुठे आहेत? त्यावेळी प्रकल्प सल्लागार यांनी चौथ्या फोटोत स्थानिक शेतकरी असल्याचे सांगितले. श्री चिंदरकर यांनी आक्षेप नोंदविला की फोटो पाहून सांगितले की शेतकरी शेतात काम करताना फोटो घेतलेला आहे.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सांगितले की आपले आक्षेप नोंदवावाते.

श्री चिंदरकर यांनी आक्षेप नोंदविताना विचारणा केली की जेथून सॅम्पल घेतले, तो गट नं. कोणता आहे? त्यांनी उपस्थित शेतक-यांना विचारणा केली की तुमच्या संमतीशिवाय शेतातील मातीचा नमुना, बोअरच्या पाण्याचा नमुना घेतलेला असेल तर त्यास तुमची संमती आहे का? सर्व शेतक-यांनी मिळून नकारात्मक उत्तर दिले.

**एका उपस्थित शेतक-याने सांगितले** की कामगार काम करत असताना माती नेली, त्यांनी सांगितले की माती परिक्षणासाठी माती नेत आहोत.

**श्री चिंदरकर** यांनी आक्षेप नोंदविला की शेतक-यांच्या पूर्व परवानगीशिवाय तो नसताना विहित पध्दती, नियमाशिवाय सॅम्पल गोळा करण्यात आलेले आहेत. तरी त्या सॅम्पलींगला कायदेशीर मान्यता देता येत नाही. अध्यक्ष यांनी आक्षेप तेवढे सांगण्याची सूचना केली. त्यांनी सांगितलेल्या स्थानांवरुन जल, हवेचे नमुने घेतले हे सिध्द होत नाही. त्यामुळे या खोट्या अहवालावरच आमचा आक्षेप आहे.

यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की हाय वे कायद्यानुसार आम्हाला कोणत्याही शेतावर जाऊन नमुना गोळा करण्याचा अधिकार आहे. जरी एकदा भूखंड हा खाजगी असला पण तो अधिसूचित झालेला असला तर तेथून नमुने घेण्याचा अधिकार आहे. आमचा आक्षेप आहे की परवानगी न घेता नमुने घेणे हे अवैध आहे.

**श्री चिंदरकर यांनी** आक्षेप नोंदविला प्रकल्प सल्लागार यांनी कोणतीही साईट व्हिझिट न करता अहवाल तयार केलेला आहे. तसेच विहित निर्देशांप्रमाणे कुठलाच नमुना गोळा करण्यात आलेले असून ते अवैध आहेत. त्यांनी तयार केलेला ईआयए अहवाल हा बोगस डेटावर आहे.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी उपस्थित आक्षेपांवर पर्यावरण सल्लागार यांना स्पष्टीकरण मागितले. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की फोटोसहित पुरावे दिलेले आहेत. त्याचप्रमाणे आमच्या तज्ज्ञ व्यक्ती त्यावेळी उपस्थित होत्या. श्री चिंदरकर यांनी मागणी केली तो अहवाल, ती तज्ज्ञ व्यक्ती, ते सॅम्पल आम्हाला द्या. गावातील सरपंच किंवा गावातील दोन व्यक्ती पंच म्हणून असा पुरावा द्यावा. आयोजक यांनी पर्यावरणीय आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

**श्री चिंदरकर** नमुने गोळा केल्याचे पुरावे दिलेले नाही तर ते उपलब्ध करण्याचे आवाहन केले. प्रायमरी डेटा शीट असल्यास ती उपलब्ध करण्यात यावी. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सद्या जरी उपलब्ध नसला तरी तो उपलब्ध करुन देण्यात येईल. श्री चिंदरकर यांनी आक्षेप नोंदविला की विहित पध्दतीने डेटा तयार करण्यात आलेला नाही.

**श्री चिंदरकर** यांनी आक्षेप नोंदविला येथून सॅम्पल हैद्राबादला नेली, त्यात जैविक संसाधनाचे नमुने आहेत. आपण जे सॅम्पल गोळा केली, त्यात नैसर्गिक साधने आहेत. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सर्व सॅम्पल्स आम्ही एनएबीएल मंजूर प्रयोगशाळेतून पृथ्थकरण करण्यात येते. श्री चिंदरकर यांनी प्रश्न विचारला की जैवविविधतेसाठी नैसर्गिक संसाधने आपण गोळा केलेले आहेत.

**आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी ज्यांना सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप नोंदवायचे असल्यास त्यांनी प्रथम हात वर करावेत, आपण जेथे बसलात आहात, तेथे माईकची व्यवस्था आहे. सूचना करण्यापूर्वी आपले संपूर्ण नांव व गावाचे नांव सांगावे.

**श्री पंकज प्रकाश चिंदरकर** यांनी उपस्थित ग्रामस्थांना आपल्यावतीने बोलल्यास चालेल काय याबाबत विचारणा केली. उपस्थित ग्रामस्थांनी गावाच्या, ग्रामस्थांच्या वतीने बोलण्याची परवानगी घेतली.

**श्री पंकज प्रकास चिंदरकर** यांनी सांगितले की आपण प्रकल्प परिसरात जे मॉनिटरींग केले, म्हणजे जल, वायू, जैव-वैविधता, ते नमुने/सॅम्पलिंग आपल्याकडे उपलब्ध आहेत काय?

**प्रकल्प सल्लागार यांनी** सांगितले की नमुने गोळा करण्यात आलेले नाही, तर जे निर्देशानास आले, त्यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

**श्री पंकज प्रकाश चिंदरकर** यांनी मत मांडले की ग्रामपंचायतीच्या परवानगीशिवाय आपण येथील मातीचा नमुना आपल्या सोयीनुसार गोळा केला, तो हैद्राबाद येथील आपल्या प्रयोगशाळेत तपासला व त्याचे रिझल्टस/परिणाम प्रकाशित केलेले आहेत. त्याचा वापर आपण व्यावसायिकतेसाठी करणार आहात काय?

प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले जो अहवाल प्रसिध्द करण्यात आला, तो जनतेसाठीच प्रकाशित करण्यात आलेला आहे.

**श्री पंकज प्रकाश चिंदरकर** यांनी नमुने गोळा करताना जी पध्दत वापरण्यात आली, त्याबाबत स्पष्टीकरण देण्याची सूचना केली.

**प्रकल्प सल्लागार यांनी** सांगितले की शासनाच्या निर्देशांप्रमाणे वेगवेगळ्या स्थानांवर नमुने गोळा करण्यात आलेले आहेत. त्यासाठी पारित केलेली शास्त्रीय पध्दत वापरण्यात आली. **श्री चिंदरकर यांनी** scientific procedure कुठली वापरली याबाबत विचारणा केली. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की कुठली scientific procedure वापरली याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे. आपणास जे उत्तर द्यायचे ते देण्यात यावे. जर देणार नसेल, तर तसेही सांगण्यात यावे.

त्यावेळी **आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सांगितले की संबंधित व्यक्तीच आक्षेप आहे की आपण शास्त्रीयदृष्ट्या सॅम्पल गोळा केलेले आहे काय, असल्यास ते कसे त्याचे स्पष्टीकरण देण्यात यावे.

**श्री चिंदरकर यांनी** आक्षेप घेतला की शास्त्रीयदृष्टया नमुने (samples) कसे गोळा करावे हे आपणास माहिती नाही, म्हणून आपणे शास्त्रीयदृष्ट्या नमुने गोळा केलेले नाहीत. नंतर उरलेल्या नमुन्यांचे काय करण्यात आले, याबाबत संपूर्ण माहिती देण्यात यावी. आपण सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यात यावीत, जर देणार नसाल, तर तसेही सांगण्यात यावे. कारण गावातील लोकांना घेऊनच त्यांच्यासमोर शास्त्रीय पध्दतीने नमुने गोळा करणे आवश्यक होते. तुम्ही परस्पर नमुने गोळा करुन आमच्या शेतक-यांच्या जमिनीची किंमत ठरविली. आमच्या ब-याच जमिनी पडीक माळरान दाखविलेल्या आहेत. उपस्थित शेतक-यांनी त्यांना पाठिंबा दिला.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सांगितले की ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी असून जमिनीचा पोत व त्याची किंमत ठरविणे या समितीच्या अखत्यारित येत नाही. तर फक्त पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोंदविण्यात यावेत.

**श्री बाळासाहेब पांडुरंग मोरे, अध्यक्ष, सुरत-चेन्नाई ग्रीनफिल्ड हायवे संघर्ष समिती** यांनी सांगितले की अक्कलकोट तालुका उत्तर, दक्षिण आणि बार्शी या तालुक्यातील शेतक-यांतर्फे श्री चिंदरकर यांना बोलण्याचे पूर्ण अधिकार हे देण्यात आलेले आहे.

**श्री पंकज प्रकाश चिंदरकर** यांनी माती सर्वेक्षणाबाबत प्रश्न विचारण्यास सुरवात केली. त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की पान नं. ४७ वर हवा प्रदूषण सर्वेक्षणाबाबत माहिती दिलेली आहे. श्री चिंदरकर यांनी आक्षेप नोंदविला की माती सर्वेक्षणाबाबत प्रश्न विचारला असता प्रकल्प अधिकारी हवा प्रदूषणाबाबत माहिती सांगत आहेत.

**अध्यक्ष यांनी** सांगितले की जे प्रश्न विचारण्यात आले, त्याचेच उत्तर देण्यात यावे. मातीचे सॅम्पलिंगबाबत विचारणा करण्यात आलेली आहे, त्याचेच उत्तर द्यावे. मातीचे सॅम्पल घेताना शास्त्रीयदृष्ट्या गोळा केला का याबाबत उत्तर देण्यात यावे.

**प्रकल्प सल्लागार यांनी** सांगितले की पान नं. ८२ वर मातीचे सर्वेक्षण करण्याची पध्दत दिलेली आहे. त्यावेळी उपस्थित शेतक-यांनी प्रकल्प प्रवर्तकांना मराठी किंवा हिन्दीमध्ये उतर देण्याची मागणी केली.

येथे **आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** मातीचा नमुना गोळा करताना व त्याचे पृथ्थकरण करताना जी शास्त्रीय पध्दत वापरण्यात आली ती सांगण्यात यावी.

प्रकल्प प्रवर्तकांनी पृथ्थकरण कसे केले, याबाबत माहिती वाचून दाखविली. **त्यावेळी श्री चिंदरकर यांनी** आक्षेप नोंदविला की आपण सॅम्पल कसे पृथ्थकरण केले हे सांगत आहेत. आपणास सॅम्पल कसे गोळा केले (Sample) याची माहिती देण्यास सांगितले. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांप्रमाणे नमुने गोळा करण्यात आले.

**श्री चिंदरकर यांनी** आक्षेप नोंदविला की प्रत्यक्ष सॅम्पल कसे घ्यावे हेच त्यांना माहित नाही, प्रकल्प प्रवर्तक फक्त सीपीसीबीचे नांव सांगत आहेत. म्हणजे त्यांनी घेतलेले सॅम्पल हे बोगस आहेत. अध्यक्ष यांनी सांगितले की या आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे.

**श्री चिंदरकर यांनी** सांगितले की सर्वेक्षणात मातीचे परिक्षण करण्यात येणार आहे. तर मातीचा वापर कसा व कुठे करणार आहात?

त्यावेळी प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की या सर्वेक्षणाचा उपयोग हा मातीची सद्यस्थिती व प्रकल्प पूर्णपणे कार्यान्वित झाल्यानंतर मातीच्या गुणवत्तेत झालेला फरक कळण्यासाठी आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की पर्यावरण सल्लागार यांनी जो मातीचा अभ्यास केलेला आहे तो अहवाल तयार करण्यासाठी केलेला आहे. सर्वेक्षण मातीची सद्यस्थितीसाठी काय आहे त्यासाठी आहे. येथील माती प्रकल्पासाठी वापरायची

की नाही हे त्यावेळेची परिस्थिती, त्यासाठी खर्च त्याप्रमाणे प्रशासन निर्णय घेत असते.

**श्री चिंदरकर यांनी** आक्षेप नोंदविला की जरी प्रकल्प प्रवर्तक दिशाभूल करुन सांगत आहेत की हा अहवाल संशोधनासाठी केला हे साफ खोटे आहे. ते येथील मुरुम, माती प्रकल्पासाठी वापरणार आहेत.

**त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी यावर आक्षेप घेताना** सांगितले की हे चुकीचे सांगणे आहे. सदरहू सर्वेक्षण हे फक्त संशोधनासाठी करण्यात आलेले असून हाय वे बांधताना प्रकल्पासाठी वेगळे तंत्र (mode) असून त्यानुसार तेथील माती चेक करणार व ती योग्य असल्यास त्याचा वापरण्यात येणार आहे.

**आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** श्री चिंदरकर यांना मुद्देसुद आक्षेप नोंदविण्याची सूचना केली.

**श्री चिंदरकर यांनी** आक्षेप नोंदविला की सर्वेक्षण करताना किती लोक होते, किती शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ होते, त्यांनी फक्त प्रतिनिधी असे लिहिलेले आहे. तसेच किती किलोमीटर प्रकल्प आहे, तो कोणकोणत्या गावातून जात आहे याची माहिती देण्यात यावी.

त्यावेळी **अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. बैठकीत उपस्थित करण्यात येणा-या सर्व मुद्दयांची नोंद घेण्यात येत आहेत.

**श्री चिंदरकर यांनी** परत आक्षेप नोंदविता सांगितले की प्रकल्प अहवालात प्रकल्पाच्या सर्व क्षेत्राचे सर्वेक्षण करण्यात आल्याचे सांगितले, रस्त्याच्या डाव्या व उजव्या बाजूला ५.० मीटर अंतर सोडून सर्वेक्षण केल्याचे अहवालात नमूद केलेले आहे. ज्या गावात सदरहू प्रकल्पाच जास्त प्रभाव पडणार नाही, त्या गावाचेही सर्वेक्षण करण्यात आलेले आहे. माझा आक्षेप आहे की तसे सर्वेक्षण करण्यातच आलेले नाही.

**श्री चिंदरकर यांनी** प्रश्न विचारला की नकाशात अक्कलकोट ते अहमदनगर दाखविले आहे. एकंदर किती क्षेत्रात सर्वेक्षण केले आणि त्याचा मापदंड काय आहे?

**त्यावेळेस प्रकल्प प्रवर्तक यांनी** उत्तर दिले की ५००.० दोन्ही बाजूस सर्वेक्षण करण्यात आलेले आहे. आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी आकडेवारीची मागणी करण्यात आलेली असून ती सांगण्याची सूचना केली.

**प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर** दिले की जो महामार्गाचा स्ट्रेच आहे, तेवढे सर्वेक्षण आणि नमुने घेण्यात आलेले आहे.

श्री चिंदरकर यांनी विचारणा केली की महामार्ग हा सहा पदरी असून किती मीटर अंतरावर नमुने घेण्यात आले? प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की ६० मीटरमध्ये नमुना घेण्यात आले.

श्री चिंदरकर यांनी आक्षेप नोंदविला की हे दिशाभूल करत असून अहवालात असा उल्लेख आहे की ५०० -५०० मीटरचे सर्वेक्षण करण्यात आले.

**प्रकल्प सल्लागार यांनी** सांगितले की एक आरओड्ब्लु होता. तो ६० मीटर झाला, तर दुसरा influence zone असतो. तो ५०० मीटर असतो. ते guidelines प्रमाणे घेतो.

त्यावेळी श्री चिंदरकर यांनी आक्षेप नोंदविला की आमची जमिन घेणार आहेत, तर ते लोकांना कळून द्यावे. त्यांना आक्षेप नोंदविला की सर्वेक्षण केल्याचा नकाशाच यांच्याकडे नाही.

**प्रकल्प सल्लागार यांनी** सांगितले की सर्वेक्षण हे प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघातच घ्यावे लागते. क्षेत्राची विभागणी करण्यात येते. ५०० मीटरपेक्षा जास्त जात नाही. पान नं. १०१ वर माहिती आहे असे सांगण्यात आले. ५०० मीटर हे अधिसूचनेनुसार घेण्यात आलेले आहे असे सांगितले.

**प्रतिनिधी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री चिंदरकर यांना** त्यांचा काही आक्षेप असल्यास तो नोंदविण्याचे आवाहन केले. त्यावेळी चिंदरकर यांनी सांगितले की आपण स्थान, कुठे नमुना घेतला ते स्थान याची माहिती द्यावी. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पान नं.४१ वर त्याबाबतीत उल्लेख आहे. - ६० मीटरच्या आत किंवा ५०० मीटर दोन्ही बाजूस.

**श्री चिंदरकर यांनी** सांगितले की या प्रकल्पासाठी ते येथील नैसर्गिक संसाधने वापरणार आहेत. ते आता ते सांगत नाहीत, असा आक्षेप नोंदविला.

**प्रकल्प प्रवर्तक यांनी** सांगितले की ईआयए अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघात सर्वेक्षण करणे बंधनकारक आहे.

**यावेळी श्री चिंदरकर यांनी** आक्षेप नोंदविला की पर्यावरण सर्वेक्षणाच्या अंतर्गत यांनी परिसरातील नैसर्गिक संसाधने वापरून व्यावसायिक हितसंबंध जपण्यासाठी याचा वापर होणार आहे असा सर्वांचा समज झालेला आहे. कारण येथील चांगले पाणी वापरुन त्याचा परिणाम हा येथील पर्यावरणावर होणार आहे.

येथे **आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** सांगितले की आपल्या सर्वेक्षणाचा मूळ उद्देश काय होता हे थोडक्यात विषद करण्यात यावे.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले** की श्री चिंदरकर यांनी घेतलेल्या आक्षेपाची नोंद घ्यावी की प्रकल्प प्रवर्तकांनी या सर्वेक्षणाचा उद्देशच लिहिलेला नाही.

पर्यावरण सल्लागार यांनी पान नं.२ हेडिंग नं. १.२ उद्देश इंग्रजीत वाचून दाखविले. त्यांनी सांगितले प्रकल्प परिसरात पर्यावरणाची सद्यस्थिती आणि प्रकल्पाच्या प्रभावामुळे भविष्यात होणारा परिणाम यासाठी हा अभ्यास करण्यात येतो. म्हणजे यासाठी वेगळे सर्वेक्षण आवश्यक होते, त्यासाठी Bio-Diversity Board ची पूर्व परवानगी घेणे आवश्यक होते. म्हणजे या पर्यावरणीय डेटामधूनच प्रकल्पाला लागणारी नैसर्गिक संसाधने वापरण्यात येणार आहेत असा अर्थ होतो.

**आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी यांनी** येथे मत मांडले की श्री चिंदरकरांचे असा आक्षेप आहे की या अहवालाचा उपयोग ते व्यावसायिक हितसंबंधासाठी करतील. तर प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की हा प्राथमिक अहवाल असुन त्यांना येथील नैसर्गिक संसाधने जर वापरावयाची असतील, तर त्यांना परत सर्वेक्षण करावे लागेल. त्यासाठी सक्षम-प्राधिकरणाकडून मान्यता घ्यावीच लागेल.

येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सूचना केली की जर श्री चिंदरकर यांना हा अहवाल खोटा वाटत असेल, तर त्यांनी तसे मत

मांडावे, याची नोंद घेण्यात येईल. श्री चिंदरकर यांनी मत मांडले आमचे या पूर्ण अहवालावरच आक्षेप आहे. अध्यक्ष यांनी नोंद घेतल्याचे सांगितले. सदरहू इतिवृत व अहवाल याबाबत शासन योग्य तो निर्णय घेईल.

**अध्यक्ष यांनी** सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या मुद्द्यांचे रेकॉर्डींग होत आहे. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सदरहू व्यक्तीने जर लेखी आक्षेप दिल्यास त्यास लेखी उत्तर देण्यात येईल.

**सदस्य यांनी** श्री चिंदरकरांना फक्त मुद्देसुद आक्षेप, सूचना मांडण्याचे आवाहन केले.

**श्री चिंदरकर यांनी** सांगितले की परिसरातील नैसर्गिक संसाधने वापरण्याचा पहिला हक्क हा येथील ग्रामस्थांचा आहे. गावक-यांच्या हक्कांवर अतिक्रमण करून कुठलाही मोबदला न देता, त्यातून मिळणा-या लाभाचे समान वाटप न करता,त्यापासून गावाला फायदा न देता व्यावसायिक उद्देशाने वापर करण्याचा इरादा दिसतो. अध्यक्ष यांनी नोंद घेतल्याचे सांगितले. येथे सदस्य यांनी मत मांडले की आपण मुद्देनिहाय आक्षेप नोंदविण्यात यावेत.

**श्री चिंदरकर यांनी** विचारणा केली की टीओआरचे अनुपालन दिलेले आहे. ते आपल्या अहवालात कुठे ते दाखवून द्यावे. अध्यक्ष व सदस्य यांनी टीओआरमधील आवश्यक मुद्दा विचारण्यात यावा अशी सूचना श्री चिंदरकरांना दिली. त्यास उत्तर पर्यावरण सल्लागार हे देतील.

**आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांना सांगितले की टीओआर चा पहिला मुद्दा संक्षिप्त येथील ग्रामस्थांना मराठीत सांगण्यात यावा. यानंतर प्रकल्प प्रवर्तक यांना सांगितले की सोलापूर जिल्ह्यासाठी ०.१८ हेक्टर वनजमिन घ्यावी लागत असून याबाबत संक्षिप्त निवेदन सादर केले

**श्री चिंदरकर यांनी** आक्षेप नोंदविला की येथे कुठल्याही प्रकारचा कॉरिडॉर वन्यजीवांसाठी ठेवलेला नाही. त्यासाठी किती दिवसांचे सर्वेक्षण करण्यात आले. तुम्ही ते केलेले नाही.

त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की Wild Life Institute, Dehradun यांचाही अहवाल घेण्यात येणार आहे.

श्री चिंदरकर यांनी विचारणा केली की तोंडी चर्चेचा अहवालात उल्लेख आहे काय. त्याचा कुठेही संपर्क नाही.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की वनविभागाची चर्चा केल्यानंतर ते सर्वेक्षणात बरोबर होते.

सदस्य यांनी आक्षेप नोंदविण्याची सूचना केली.

**श्री चिंदरकर यांनी आक्षेप नोंदविला** की कुठल्याही प्रकारची वाईल्ड लाईफ wild life activity दिसली नाही असे अहवालात लिहिलेले आहे. म्हणजे एका बाजूला wild life activity दिसली नाही असे लिहितात व एका बाजूला wild life activity दिसली असे लिहितात.

**याबाबत प्रकल्प प्रवर्तक यांनी** उत्तर दिले की जसा वाघांसाठी कॉरिडॉर असतो, तसा येथे नाही. पण तेथे प्रासंगिक वन्य प्राण्यांची हालचाल दिसते. त्यासाठी क़ॉरिडॉर केलेला आहे.

**त्यावेळी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** श्री चिंदरकर यांना मुद्देसुद आक्षेप नोंदवावेत अशी सूचना केली.

जो सेकंडरी डेटा घेतला, त्याची पोचपावती नाही -

**सदस्य यांनी विचारणा केली** असताना त्यांनी लावलेली नाही असे सांगितले.

सदस्य यांनी पुढचा मुद्दा घेण्याची सूचना केली. -

Bio-diversity data मध्ये तफावत आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की त्याचे उत्तर देण्यात आलेले आहे. विशिष्ट कॉरिडॉर नेमलेला नाही. पण जेथे वन्यप्राणी प्रासंगिक आढळले, तेथे अंडरपासची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

तसेच एकाठिकाणी गवताळ प्रदेश म्हणतात, तर दुसरीकडे घनदाट जंगल नाही असे लिहिलेले आहे. आक्षेप आहे की grass land bio-diversity विचार केलेला नाही.

यावेळी **प्रतिनिधी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** सांगितले की आक्षेपांना जर येथे उत्तर देता आले नाही,तर तज्ज्ञ समितीसमोर उत्तर हे द्यावेच लागते, प्रसंगी नवीन टीओआर दिला जातो. तरी आपण आपले मुद्दे मांडत जावे, जरी प्रकल्प प्रवर्तक उत्तर देऊ शकले नाही, तरीही त्यांना तज्ज्ञ समितीसमोर उत्तर द्यावेच लागते.

**श्री चिंदरकर यांनी आक्षेप नोंदविताना** सांगितले की अहवालात जंगल म्हणजे उंच झाडे. वाघ, सिहं प्राणी असा अर्थ नाही. ग्रासलॅण्ड म्हणजेही जंगलच आहे. मात्र अहवालात जंगल नाही असे लिहिलेले आहे.

**प्रतिनिधी, सदस्य यांनी सांगितले** श्री चिंदरकर यांचा मुद्दा आहे की प्रकल्प प्रवर्तकांनी grass land diversity वर अभ्यास केलेला नाही, याची नोंद घेण्यात आलेली आहे. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सोलापूर जिल्ह्यासाठी वनविभागाने एक समिती नेमलेली असून ज्या काही grass land आहेत, तेथे वनविभागाने माहिती गोळा केलेली असून ती अंतिम ईआयएमध्ये समाविष्ट करण्यात येईल.

**श्री चिंदरकर यांनी आक्षेप नोंदविला** की grass land diversity Animal Identification and species पर्यावरण सल्लागार यांच्या समितीस करताच आलेले नाही. प्रतिनिधी, सदस्य यांनी सांगितले grass land diversity बाबत प्रश्न विचारण्यात येऊ नये.

त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पान न. ११० मधील २.९ मुद्दा तपासावा. श्री चिंदरकर यांनी सर्वेक्षण करतानाचा मूळ डेटा असल्यास तो दाखवावा असे सूचित केले. आयोजक यांनी सागितले की फिल्डवरील पाहणी अहवाल उपलब्ध होईल काय? हा डेटा दिशाभूल करणारा आहे. श्री चिंदरकर यांनी सोलापूर जिल्ह्यातील जैव वैविधतेची डायरी पर्यावरणविषयक समितीस सादर केली व हि डायरी इतिवृत्तासोबत तज्ञ् समितीस पाठविण्याबाबत विनंती केली. अध्यक्ष यांनी यास होकार दिला .

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत खूप लोकांनी हात वर केलेत, तरी त्यांनाही संधी देण्यात येईल.

२) <u>श्री मुकुंद शंकर दाभाडे, ढाणेगावचा रहिवाशी - गट नं. ५३७/६, बाधित शेतकरी</u>

=

माझी जमिन उताराची आहे. हा रस्ता क्रॉस जातो. माझ्या जमिनीवरील पाणी जाते, खाली ओढा आहे. वरुन येणार पाणी खाली रस्त्याला अडणार आहे. वरच्या बाजूस १०-१५ गट नं. आहेत, त्यांचे पाणी माझ्या शेतात येते. जरी ओढ्यावर पूल असेल, तरी पाणी पूर्णपणे जाणार नाही. बातम्यामध्ये बघितले की समृध्दी मार्गांवर अशा ब-याच अडचणी आलेल्या आहेत. १०-१५ एकरात तळे झालेले आहे. माझी जमिन फक्त १७० एकर आहे. ३५ गुंठे भूसंपादन झालेले आहे. मला मोबदला कमी दिला, मी अल्पभूधारक होणार आहे. माझ्या शेतात पाणी साचेल, तर मी कोणाला तक्रार करु शकतो किंवा त्यासाठी काय तरतुद केलेली आहे?

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की नाल्याचा व पावसाचा अभ्यास करुनच स्ट्रक्चर उपलब्ध केलेले आहे. तरी तुमच्या शेतात पाणी राहणार नाही, तर ते ओढ्यातून, नाल्यातून वाहून जाईल.

त्यावेळी श्री मुकुंद दाभाडे यांनी सांगितले पूर्वी अशी बैठक झालेली आहे. त्यावेळी अधिका-यांनी सांगितले की ५०० मीटरवर एक पाईपलाईन टाकून देण्यात येईल. यास उत्तर देण्यात आले की तो वापरासाठी देण्यात येईल. आम्ही आता ३ मीटर x ३ मीटर बॉक्स दिलेले आहेत. ते प्रत्येक गटात असणार आहे.

३) <u>श्री ओमप्रकाश खाजीराव पाटील, गट नं. ४१३, ४१४, पाणगाव, तालुका-बार्शी, जिल्हा-सोलापूरः-</u>

माझी जमिन आहे. बाजूल ओढा आहे. पाण्यामुळे जमिन बाधित होते, त्याला मोबदला मिळणार आहे, पण प्रकल्पामुले पाणी साचून जी जमिन बाधित होते, त्याला मोबदला मिळणार नाही. मी विस्थापित होणारच आहे, पण माझे फार मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.. आमची सूचना आहे की येथे प्रत्यक्ष येऊन सर्वेक्षण करणे गरजेचे आहे. माझ्या अडचणी दूर करण्यात याव्यात. मोजणी झाल्यानंतर

एकही अधिकारी येथे फिरकला नाही. तरी प्रत्यक्ष येऊन पाहणीर करावी आणि अडथळे दूर करावेत.

४) **श्री संतोष भारत जमदाडे आणि सुरेश भारत जमदाडे, राहणार-पानगांव, तालुका-बार्शी, जिल्हा-सोलापूरः-**

**अर्जून सगले - राहणार-पानगांव, तालुका-बार्शी, जिल्हा-सोलापूरः-**

माझी एक एकर ५५ आर जमिन जाते. त्यांनी मला ७२ गुंठेची नोटीस दिली. मोजणीमध्ये फरक आहे.

त्यावेळी **श्री ओमप्रकाश खाजीराव पाटील यांनी** आक्षेप नोंदविला की कागतोपत्री जमिन कमी, पण प्रत्यक्षात जास्त जमीन आहे._त्यांनी बराच पाठपुरावा केला. जिल्हाधिकारी कार्यालयात पत्रे लिहून ते थकले.

उपस्थित शेतक-यांनी जमिन मोबदलाबाबत विचारणा केली. . प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की येथे पानगावचे बरेच शेतकरी उपस्थित आहेत, त्यांचे जमिन अधिग्रहणाचे प्रश्न आहेत. तर पुढील आठवड्यात वेगळी पानगावसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक लावण्यात येईल. त्यावेळी शेतक-यांनी बार्शी तालुक्याचीच बैठक लावण्याची मागणी केली. प्रकल्प प्रवर्तक यांनी सहमती दर्शविली.

**त्यावेळी आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** सांगितले की सदरहू बैठक ही पर्यावरणविषयक आहे. भूसंपादन विषयासाठी वेगळे व्यासपीठ आहे. येथे पर्यावरणविषयक मुद्दे उपस्थित करण्यात यावेत.

५) **श्री आशीश कुंभार, राहणार - नागनरी गाव - गट नं. ७५,** बैठकीत नाला तयार करुन देण्याची तयारी दर्शविण्यात आलेली आहे. तर त्याची ब्लु प्रिंट देता येईल काय?

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की जे नैसर्गिक नाले आहेत, त्याचे सीमांकन आहे. तर तेथे काय करायचे याची ब्ल्यु प्रिंट देण्यात यावी. प्रकल्प प्रवर्तक यांनी ती उपलब्ध करुन देण्यात येईल असे सांगितले. येथे प्रकल्प प्रव्रर्तक यांनी सांगितले

नियोजन करताना जो नैसर्गिक पाण्याचा प्रवाह जात असेल, त्यात कुठलीही बाधा आणलेली नाही. तसेच २०१३ च्या कायद्यानेच बाधितांना किंमत देण्यात येते.

येथे बैठकीतील शेतक-यांनी एकत्रित सांगितले की आमचे प्रश्न सोडविल्याशिवाय आम्ही रस्ता होऊच देणार नाही

११) **श्री माने.**-मी राहतो दक्षिण सोलापूरमध्ये दुसरी या गावी, पण माझे शेत आहे अक्कलकोट तालुक्यात गोरेगावला. भूसंपादन अधिका-यांना वारंवार पत्र लिहिली, पण त्याचे उत्तर अजूनही मिळालेले नाही. माझ्या जमिनीतून रस्ता गेलेला आहे, त्याचा दरही कमी दिला, एका बाजूला पाच गुंठे, तर दुस-या बाजूला अकरा गुंठे राहिलेला आहे.

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की ही मुद्दा सारखा उपस्थित होत आहे. त्यावेळी काही शेतक-यांनी मागणी केली की राहिलेली जमिन शासनाने घेऊन त्याची मोबदला देण्यात यावा.

**श्री बाळासाहेब मोरे यांनी** आक्षेप नोदविली की भूसंपादनाची प्रक्रिया ही भूसंपादन विभाग आणि रस्ते विकास महामंडळ यांनी जी राबविलेली आहे, जे झाडांचे, तळे यांचे जे मुल्यमापन करण्यात आलेले आहे, ते प्रत्यक्ष/साईटवर जाऊन राबविलेली नाही. त्यामुळे शेतक-यांवर अन्याय झालेला आहे. तरी आमची विनंती आहे की भूसंपादनाची प्रक्रिया रद्द करुन नव्याने प्रक्रिया करण्यात यावी. सर्व भूसंपादन प्रक्रियेवरच आमचा आक्षेप आहे.

दुसरा आक्षेप आहे की रस्ते विकास महामंडळ चाळीस हजार कोटीची रस्ता बांधत आहे. आणि शेतक-यांना फक्त पाच लाख भाव देत आहेत. आमची विनंती आहे की चाळीस हजार कोटीसाठी कंपनीला वीस वर्षे टोल वसूलीचे काम देत आहेत, तर कमी भाव देऊन नुकसान करत आहेत. तर पंचेचाळीस हजार कोटीचा रस्ता व कंपनीला टोल वसूलीसाठी बावीस वर्षे कंत्राट देऊन शेतक-याला वाढीव भाव द्यावा ही आमची मागणी आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की आम्ही संयुक्त संघ (Joint Team) केलेल्या होत्या, प्रत्येक गटाच्या शेतक-यांबरोबर आमचे फोटो साईटवरचे आहेत. आम्ही ९९%

योग्य प्रकारे करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आमच्याकडे लॅन्ड रेकॉर्ड हे १८५६ पासूनचे आहे. त्यातही दुरुस्ती केलेली आहे, तेसुध्दा आहे. आम्ही साईटवर जाऊन त्या शेतक-याचे फोटो घेतलेले आहेत. अध्यक्ष यांनी सांगितले की दोन प्रकारे जमिन अधिग्रहण करण्यात येते, एक संमतीने, दुसरे जर संमती नसेल, तर अधिसूचना काढावी लागते.

१३) <u>**श्री संतोष भारत जमदाडे, गट नं.१५५४, राहणार-पानगाव,तालुका-बार्शी,जिल्हा-सोलापूरः**</u>

माझे शेततळे २५० X १६०, भरावाची उंची ४४ फूट आहे. रस्त्याच्या अगदी मध्ये आहे. पण त्याचे मुल्यांकन १०० X १०० केलेले आहे. त्यास पंचवीस लाख रुपये खर्च आलेला आहे. माझे पूर्ण तळे अधिग्रहित करण्यात आलेले असून मला फक्त पाच लाख मोबदला दिलेला आहे.

श्री चिंदरकर यांनी सांगितले की पर्यावरण व शाश्वत विकास यादृष्टीने जल संवर्धनाचे प्रकल्प आहेत. पावसाचे पाणी त्यांनी वाचविले व साठविलेले आहे. त्याचा वापर श्री जमदाडे यांच्यासोबत इतरही शेतकरी करत आहेत. त्या शेततळाच्या फायद्याचा विचारच करण्यात आलेला नाही. तरी त्याची Environmental Value काढण्यात यावी.

अध्यक्ष यांनी मत मांडले की शासन निर्णयाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** उपस्थितांना सांगितले की जनसुनावणी संपल्यानंतरही जर कोणास लेखी सूचना, आक्षेप नोंदविण्याचे असल्यास ते सादर करु शकतात.

**श्री चिंदलकर यांनी** पान न. १५ काढण्यास सांगितले. Requirement of natural resources for the project –येथे सरळसरळ लिहिलेले आहे की या प्रकल्पासाठी नैसर्गिक संसाधनाची गरज आहे. पुढे पान नं. १७, १८ - पर्यावरण सल्लागार यांनी स्पष्टीकरण दिले की हा जो संपूर्ण प्रकल्प आहे, त्याच्या तांत्रिक बाबी दिलेल्या आहेत. त्यात प्रकल्पासाठी लागणारी साधने व त्यांचे प्रमाण सांगितलेले आहे. ते अंतिम नसून ढोबळमानाने सांगितलेले आहे.

**श्री चिंदलकर यांनी** आक्षेप नोंदविला की प्रकल्पात रोज ४०,०००.० लिटर पाणी लागणार आहे. तेथील नैसर्गीक जलस्त्रोतावर प्रथम स्थानिकांचा हक्क आहे. Bio-Diversity Act नुसार जर एखाद्या गावातील तळ्यातील पाणी घेतले, तर त्यापासून होणारा फायद्याचे समान वाटणी गावासाठी करावी लागते. अहवालात असे लिहिलेले आहे की गावातील पाण्याची भरपाई ही रेनवॉटर हार्व्सटींगने करण्यात येणार आहे. तर त्यासाठी पीट्स हे रस्त्याच्या कडेला करणार आहेत, तर पाणी हे रस्त्यापासून ५०० मीटर अंतरावरील तळ्यातून घेणार आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून गेले पाच वर्षात पाणी टंचाईसाठी खर्च करण्यात आलेला आहे. मागच्या वर्षी अकरा कोटीचा आकडा, या वर्षी ५५ कोटी गेलेला आहे.

**प्रतिनिधी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** सांगितले की रेन वॉटर हार्व्हेस्टीगसाठी प्रकल्प प्रवर्तकांनी काही रक्कम राखून ठेवलेला असणारच.

आक्षेप नोदविण्यात आला की त्यासाठी निधी राखीव ठेवल्याचा उल्लेख नाही, तर त्यासाठी विशिष्ट रक्कम राखीव ठेवण्यात यावी.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की रेन वॉटर हार्व्हेस्टिंग हा प्रकल्पाचाच एक भाग आहे, त्यासाठी निधीची तरतुद करण्यात येणार आहे.

**अध्यक्ष यांनी विचारणा केली** जर आपण गावातील पाणी प्रकल्पासाठी उचलणार आहात, तर तेथील पाण्याचे नुकसान हे कसे भरुन काढणार? त्यासाठी तरतुद काय करण्यात आलेली आहे?

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रत्येक ५०० मीटरवर रस्त्याच्या कडेला रेन वॉटर हार्व्हेस्टिंग करण्यात आलेले आहे.

**श्री चिंदरकर यांनी मागणी केली** की प्रकल्प प्रवर्तक गावात रेन वॉटर हार्व्हेस्टिंग योजना राबविणार आहात का? प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सोलापूर जिल्ह्यातील वळसे गावातील तलावाचे खोलीकंरण करण्यात आले, तसेच विविध

गावात ८४ ठिकाणी तलावांची खोलीकरण करण्यात आले. तर जेथे ग्रामपंचायत, जिल्हा प्रशासन परवानगी देईल, तेथे ते करण्यात येईल.

श्री चिंदरकर यांनी सांगितले की त्यासाठी Bio-Diversity कायद्यातच तरतुद करण्यात आलेली आहे. माझा पहिला आक्षेप आहे की Bio-Diversity Board ची परवानगीच घेतलेली नाही. अध्यक्ष यांनी Bio-Diversity Board बाबत माहिती विचारली, ती श्री चिंदरकर यांनी दिली. अध्यक्ष यांनी नियमाप्रमाणे Bio-Diversity कायद्यानुसार तरतुद करण्याची सूचना प्रकल्प प्रवर्तकांना दिली. त्यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तकांना Bio-Diversity Board चे म्हणणे ऐकावेच लागते.

सूचना अशी आहे की जोपर्यंत जैविक संसाधनांचा शाश्वत वापरापासून मिळणा-या लाभाचा समान वाटप करणार नाही, त्याचे अंदाजपत्रक देणार नाहीत, तोपर्यत पर्यावरण अनुमतीसुध्दा मिळू नये, अशी आमची स्पष्ट मागणी आहे.

त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की Bio-Diversity चा प्लॅन तयार करण्यात येत आहे. त्यासाठी चार कोटी रुपये राखीव ठेवण्यात आलेले आहेत. त्यावेळी श्री चिंदरकर यांनी सांगितले की त्यासाठी करार होणे गरजेचे आहे. तसा प्लॅन देणे गरजेचे आहे. आपण जो Environment Management Plan बरोबरच Bio-Diversity Plan देणे गरजेचे आहे.

त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की भारतात कुठल्याही नियम अंमलबजावणीसाठी सक्षम विभाग आहेत. जशी गरज असेल किंवा जसे आदेश असतील, त्याप्रमाणे संमती घेण्यात येईल.

प्रतिनिधी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे मत मांडले की श्री चिंदरकर यांची अशी सूचना आहे की Bio-Diversity restoration साठी योजना (प्लॅन) प्रकल्प प्रवर्तक यांनी तयार केलेला नाही. तर Bio-Diversity Plan तयार करुन त्यासाठी प्रती वर्ष निधीची रक्कम ही राखीव ठेवण्यात यावी व ती सर्व योजना सादर करण्यात यावी.याची नोंद सुधारित ईआयए अहवालात घेण्यात यावी.

**प्रतिनिधी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** सांगितले की बैठकीत प्रारुप ईआयए असून बैठकीतील सूचनांची नोंद घेऊन सुधारित ईआयए तयार करण्यात येईल.

श्री **चिंदरकर यांनी आक्षेप** नोंदविला की जोपर्यंत सोलापूर जिल्ह्यातील जैव-विविधतेचे जैविक संसाधनांचा शाश्वत वापरापासून मिळणा-या लाभाचा समान वाटप करणार नाही, त्याचे अंदाजपत्रक देणार नाहीत, जोपर्यंत करार करणार नाहीत, तोपर्यंत पर्यावरण अनुमतीसुध्दा मिळू नये, अशी आमची स्पष्ट मागणी आहे. नैसर्गिक संसाधनात पाणी, माती आहे. दगड काढणार, म्हणजे तेथील बायो-मास हा नष्ट होणार आहे.

तसेच गावात परंपरागत गायरान असते. गावातील लोक त्याचे राखण करतात. गावातील पशुधन हे त्याच्यावरच जगते, त्यामुळे लोकांना दुधदुभते मिळते. प्रकल्प प्रवर्तक त्यांच्या व्यावसायिक फायद्यासाठी तेथील बायो-मास नष्ट करणार आहेत. त्याची नुकसान भरपाई कशी करणार?

**प्रतिनिधी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सांगितले की शासनाने प्रत्येक गावात यासाठी राखीव क्षेत्र अधिसूचित केलेले आहे. त्याशिवाय खाजगी क्षेत्र असते, त्यावर आपण नियंत्रण ठेवू शकत नाही. त्यावेळी श्री चिंदरकर यांनी आक्षेप नोंदविला की ते खाजगी क्षेत्र असलेले मालक वर्षभर गुरे, मेंढरे चरण्यासाठी त्यांचे खाजगी क्षेत्र देतात, त्याला स्थानिक भाषेत खंडान म्हणतात. या प्रकल्पामुळे त्यांचे होणा-या नुकसानीचा मोबदला कोण देणार? तसेच भूखंडाचे मालक, नंतर चराईसाठी गायी, मेढ्या आणणारे गावातील मुले यांचा रोजगार जाणार आहे. यांना भरपाई कशी देण्यात येणार? गावातील कुंभार तेथील माती आणून मडकी बनवितो. गावातील वैदू औषधी वनस्पती आणून गावठी औषधे गावातील गोरगरिबांना देतो.

तरी गावातील हे बरेच लोक हे ज्यावर अबलंबून आहेत, त्यांची उपजिविका नष्ट करण्याचा प्रयत्न चालू आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की आम्ही कोणतीही शासकीय जमीन घेणार नाही, तर खाजगी जमीन मालकाशी चर्चा करुनच त्यांची संमती असेल तरच पुढील निर्णय घेणार आहोत. त्यामुळे पुढील प्रश्न निर्माण होणारच नाही. श्री चिंदरकर यांनी सांगितले की तुम्हा दगड काढण्यासाठी खाणी करणार, त्याचा पर्यावरणावर काय परिणाम होईल याचा काय अभ्यास केलेला आहे काय?

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की हा तात्पुरता प्लॅन दिला असून जेव्हा याबाबत मतैक्य होईल, त्याचवेळेस त्यांच्याशी वैयक्तिक करार करण्यात येतील व शासनाचे सर्व निर्देश पाळण्यात येतील. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की मायनिंगबाबतचे शासनाचे सर्व निर्देश पाळण्यात येतील.

श्री चिंदरकर यांनी वन्य प्राण्यांबाबत मुद्दा उपस्थित केला. त्यावेळी अध्यक्ष आणि प्रतिनिधी, सदस्य यांनी सांगितले की पाणी, फ्लोरा व फौऊना, वन्य प्राण्यांसाठी वेगळी मार्गिका (corridor) नाही हे आक्षेप आपण नोंदविलेले असून त्या व्यतिरिक्त असल्यास ते नोंदवावेत.

श्री **चिंदरकर यांनी टीओआरमधील मुद्दा क्रं. ४** - प्लॅन मिळाल्याशिवाय त्यावर सूचना, आक्षेप नोंदविता येतील. तो प्लॅनच नाही. त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सागितले की प्रथण mitigation measures कळवावी लागतात, त्यावर भारत सरकारकडून योजनेला मंजूरी मिळते ती अटी व शर्ती लागून. त्या अटी व शर्तीनुसार करार करण्यात येतात. त्यांनी सांगितले की जुना रोड कील चा डेटा उपलब्ध करण्यात आलेला आहे. आमचे सर्वेक्षण झालेले असून तिसरा पक्ष म्हणून Indian Wild Life Agency. डेहराडून यांना आमंत्रित करण्यात आलेले आहे. त्यांचा अहवाल अपेक्षित आहे. त्यानंतर वनविभाग वनविभाग मार्गिका व रस्त्यास परवानगी देते. श्री चिंदरकर यांनी आक्षेप नोंदविला की प्रकल्प प्रवर्तक यांनी अहवाल उपलब्ध केलेला नाही. त्यांनी आक्षेप नोंदविला की प्रकल्प प्रवर्तक यांनी Wild Life Conservation Plan दिलेला नाही.

प्रतिनिधी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक हे Wild Life Conservation Plan साठी Authorised Agency

नाही. वन विभागाकडे तो डेंटा असतो - परिसरातील पाळीव प्राणी, क्षेत्र, गायरान, तसेच वन्यजीव अधिवासाबाबत.

श्री चिंतरकर यांनी याबाबत Joint Action Team गठित करणे अपेक्षित होते असे मत मांडले. त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की आपण १२ काळविटे गाडीखाली येऊन मेली असे सांगितले. तर त्यासाठी वनविभागाने आम्हांला एक योजना दिली. प्रतिनिधी, सदस्य यांनी सांगितले की श्री चिंदरकर यांचे म्हणणे आहे की आपण या वन्यजीव योजनाबाबत लवचिक धोरण अंगिकारावे. सर्वेक्षण करण्यात यावे. कारण प्राण्यांचा अधिवास, हालचाल ही सतत बदलत जाते. ही योजना प्रकल्प कार्यान्वित होताना आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की श्री चिंदरकर याच्या सूचनेनुसार याबाबत एक समिती कायमस्वरुपी गठित करण्यात येईल. वन्यजीवांच्या हालचालीनुसार कॉरिडार बांधणे, अंडरपास काढणे या योजना राबविण्यात याव्यात. ब्लॅक बग हे कधिही अंडरपासने जात नाहीत ते वरच्या रस्त्यानेच पळतात. त्याबाबतीतील मराठी टेबल अहवालासोबत जोडणे.

अध्यक्ष यांनी पर्यावरणविषयक मुद्दे बैठकीच्या कार्यवाही संदर्भात चर्चिले जावेत अशी सूचना केली.

येथे चिंदरकर यांनी आक्षेप नोंदविला की अतिसंवेदनशील भागाच्या ६०० मीटर अंतरावरुन हा रस्ता जात आहे.

**त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले** की अहमदाबादच्या संस्थेने सदरहू रस्ता व त्याचे वनविभाग क्षेत्रातील alignment केलेले आहे. त्या संस्थेकडे भारतातील सर्व वनविभाग क्षेत्राचा नकाशा आहे. समजा notified area 400 meter असेल, तर आपण ६०० मीटर ठेवलेला आहे. ते सादरीकरण भारत सरकारच्या समितीसमोर ज्यात रेल्वे,वन, संरक्षण विभागाचे सचिव असतात, त्यांच्यासमोर केलेले आहे.

**अध्यक्ष यांनी** याबाबतची नोंद घेण्यात आल्याचे सांगितले. नकाशा हा अहवालासोबत शासनास सादर करण्यात येईल. अध्यक्ष यांनी विचारणा केली रस्ता ही अभायरण्यापासून किती मीटर लांब आहे याची माहिती द्यावी. प्रकल्प प्रवर्तक

यांनी सांगितले सर्वात जवळ ६०० मीटर अंतरावर रस्ता आहे. श्री चिंदरकर यांनी सांगितले मी सूचना, शिफारससुध्दा करत आहे.

**प्रकल्प प्रवर्तक यांनी** सांगितले की शासनाचे धोरण, अहवाल, कागदपत्र यानुसारच रस्त्याचा आराखडा करण्यात आलेला आहे. याबाबत वनविभागाचे निर्देश पाळण्यात आलेले आहेत.

. **श्री चिंदरकर यांनी** आक्षेप नोंदविताना त्यांनी सर्वेक्षणातील वेळ विचारली. दिवस रात्र वनविभागात सर्वेक्षण होणे गरजेचे होते असे मत मांडले. श्री चिंदरकर यांनी सागितले की तेथे वनविभाग आहे. तेथे कॉरिडॉर नाही.

अध्यक्ष यांनी सर्वेक्षणाबाबतच्या आक्षेपांची नोंद घेण्यात आलेली असून श्री चिंदरकर यांनी अभयारण्यापासून रस्त्याचे अंतर कमी असल्याची नोंद घेण्यात आलेली आहे. श्री चिंदरकर यांनी आक्षेप नोंदविला की प्रकल्प प्रवर्तक सांगतात की येथे कुठलीच endangered species नाही, मात्र वनविभागाने येथे endangered species असल्याचा उल्लेख असून त्याबाबत प्रकल्प प्रवर्तकाने कुठलेच सर्वेक्षण केलेले नाही. येथे endangered species असूनही त्याबाबत कुठलाही प्रकल्प कार्यान्वित नाही. कर्नाटका मध्ये Crocodile Project ला दहा लाख रुपये देतात. तरी प्रकल्प प्रवर्तकांनी अशा endangered species साठी निधीची तरतुद करणे आवश्यक आहे. तशी आमची मागणी आहे. अध्यक्ष यांनी ह्या सूचनेची नोंद घेतल्याचे सांगितले. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की वन्यजीव विभागाचा अहवाल आल्यानंतर तरतुद करण्यात येईल.

**अध्यक्ष यांनी मत मांडले की** श्री चिंदरकर यांचे असे म्हणणे आहे की वन्यजीवांची हालचाल, त्यांचा अधिवास हे बदलत असतात. त्याबाबत लक्ष ठेवण्यासाठी कायमची निधीची तरतुद करण्यात यावी.

त्यावेळी **प्रकल्प प्रवर्तक यांनी** सांगितले की National High Way Authority ही शासकीय संस्था असून त्यास सीएसआर नसतो.

श्री चिंदरकर यांनी आक्षेप नोंदविला की मागच्या बैठकीत सीएसआर वनविभागास दिल्याची माहिती दिली होती. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की त्या विशिष्ट प्रकल्पात वनविभागाने ती अट घातलेली होती त्याची पूर्तता करण्यात आली.

श्री चिंदरकर यांनी येथे तो देण्याची मागणी केली. अध्यक्ष यांनी या मुद्दयाची नोंद घेतल्याचे सांगितले.

अध्यक्ष यांनी श्री चिंदरकर व सर्व उपस्थितांना सांगितले की जे काही मुद्दे इतिवृतात यावे अशी अपेक्षा आहे, ते लेखी स्वरुपात सादर करण्यात यावेत. ते शासनास सादर करण्यात येतील.

श्री चिंदरकर यांनी आक्षेप नोंदविला की स्थानिक संस्था विशिष्ट कामांसाठी सक्षम असतानाही प्रकल्प प्रवर्तक हे बाहेरिल संस्थांची नियुकत् करत आहे. स्थानिक संस्था हे पूर्णवेळ काम देऊ शकत असूनही नाकारण्यात येत आहेत, मात्र काही अवधी देणा-या बाहेरिल संस्थांची नियुक्ती करण्यात येत आहे.

श्री चिंदरकर यांनी आक्षेप नोंदविला की या प्रकल्पासाठी नऊ हजार झाडे ही तोडणार आहेत. अध्यक्ष यांनी NHAI ला सूचना केली की येथे वनविभागास पारगमन पास - transit pass हवा अशी मागणी करण्यात यावी.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की वनविभाग झाडे कापण्यास परवानगी देते. झाड कापल्यानंतर त्याची पाहणी करुन वनविभाग त्यास स्वतंत्रपणे पास देते. उपस्थितांनी एकत्रितपणे ती जबाबदारी नॅशनल हाय वेची असल्याचे सांगितले, कारण वाहतुक ही त्या रस्त्यावरुन होणार आहे.

अध्यक्ष यांनी सूचना केली की झाडे तोडणा-या कंत्रांटदारालाच नॅशनल हाय वेचा पारगमन पास - transit pass पास घेतल्याशिवाय वाहतुक करुन देणार नाही ही सूचना द्यावी. प्रकल्प प्रवर्तक यांनी याची नोंद करारात घेण्यात येण्याचे आश्वासन दिले. त्यावेळी श्री चिंदरकर यांनी येथे आक्षेप नोंदविला तशी अट ही नेहमीच कंत्राटदारावर असते, पण ती पाळली जात नाही, यासाठी तेथे नॅशनल हाय वेचा सक्षम प्राधिकारी उपस्थित राहून त्याने ती दक्षता घेणेच आवश्यक आहे. तसेच झाडे तोडताना वनविभागाचा सक्षम अधिकारी उपस्थित असणे हेही आवश्यक आहे. अध्यक्ष यांनी या मुद्दयाची नोंद घेण्यात आलेली असून भविष्यात याबाबत कार्यवाही करण्याची सूचना देण्यात येते.

प्रकल्प प्रवर्तक यांनी मत मांडले की श्री चिंदरकर यांची मागणी आहे की जरी पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र (Eco-Sensitive Zone) नसले, तरीही नॅशनल हाय वे प्राधिकरणाने काही निधी ही वनविभागास दरवर्षी वनक्षेत्र जिर्णोध्दारासाठी देणे आवश्यक आहे. याची नोंद घेण्यात येऊन वरिष्ठ पातळीवरील व्यवस्थापनास कळविण्यात येईल.

श्री चिंदरकर यांनी सांगितले की असेही वनक्षेत्र आहे की सेंच्युरी येथील रस्त्यावरुन ५०० हरिणे रस्ता ओलांडून जातात. सोलापूर जिल्हयात याचे काही भाग आहेत. येथील गरीब लोक त्यांच्यासाठी उन्हाळ्यात पाण्याची व्यवस्था करतात. गावकरी शेतात थोडेसे पीक त्यांच्या खाण्यासाठी तसेच ठेवतात. प्राण्यांनाही पारंपारिक ज्ञान असते की पाणी पिण्यासाठी कोठ जायचे? मध्ये एखादा प्रकल्प उभा केला की त्यांना ते एकदम लक्षात येत नाही. तो कळप १५-२५ कि.मी फिरत असतो.

अध्यक्ष यांनी असे भाग/पॅचेस येथे आहेत का याबाबत विचारणा केली. तो अहवाल सोबत पाठविण्यात येईल

श्री चिंदरकर यांनी सांगितले की रस्त्याच्या पलिकडे वनक्षेत्र आहे, त्याचा अभ्यास व नियोजन करणे आवश्यक आहे. कुठल्या भागात वनक्षेत्र आहे, प्राण्यांच्या कुठल्या प्रजाती आहेत, त्यांचा अधिवास, हालचाल हे सर्व अभ्यासण्यात आलेले आहे. ते ज्या भागातून जातात, त्या लाईनवर/रेषेवर त्यांच्यासाठी मोकळे ठेवणे गरजेचे आहे.

त्यांनी सांगितले की सोलापूर-अक्कलकोटला बोरामणी येथे प्राण्यांचे अपघात व मृत्यू होत आहेत. तेथे ओघळ आहे. ओघळ म्हणजे रस्त्याच्या दोन्ही बाजून चढ आहे. प्राणी हे ओघळातून रस्ता क्रॉस करतात. त्याचे कारण तेथे मोठा अंडरपास केलेला नाही. किंवा तेथे फ्लाय ओव्हर तरी करणे आवश्यक होते. हे तेथील वनमजूर सांगू शकतात. तुमच्या समितीत वनमजूर आहे का? त्याचा फायदा होतो.

अध्यक्ष यांनी ही सूचना/सदरहू बाब ही वनविभागाच्या लक्षात आणून द्यावी असे प्रकल्प प्रवर्तकांना सांगितले.

श्री चिंदरकर यांनी येथे मागणी केली की आजच्या जनसुनावणीस वनखात्याचे अधिकारी असणे अपेक्षित आहे.

अध्यक्ष यांनी सांगितले की सदरहू जनसुनावणी ही पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार व सुधारित २००९ नुसार आयोजित करण्यात आलेली आहे. या समितीत जिल्हादंडाधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी हे अध्यक्ष, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे सदस्य आणि येथील स्थानिक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उप प्रादेशिक अधिकारी हे आयोजक असतात.

चर्चेमध्ये अध्यक्ष यांनी प्रकल्प प्रवर्तक यांना येथील स्थानिकांच्या मागणीनुसार जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अध्यक्ष,जिल्हा परिषद, स्थानिक लोकप्रतिनिधी, महानगरपालिका प्रशासन यांची या विषयाबाबत एक संयुक्त बैठक आयोजित करण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की ईआयए अहवाल ही प्रारूप आहे. बैठकीतील सूचना, आक्षेप यांचा विचार करुन सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल(ईआयए) तयार करुन तो शासनास सादर करण्यात येईल

श्री चिंदरकर यांनी सांगितले येथील प्रत्येक प्रश्नाला उपाय आहे आणि तो मी निश्चितपणे सांगू शकतो. त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री चिंदरकर आणि इतर सर्व उपस्थितांना लेखीस्वरुपात सूचना, आक्षेप नोंदविल्यास ते जास्त बरे होईल असे मत मांडले.

उपस्थितांनी सांगितले की अतिशय नाममात्र मोबदला शेतक-यांना मिळालेला आहे. तरी मोबदला वाढून देण्याचा प्रस्ताव पाठवावा. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की पुढच्या आठवड्यात बैठक घेण्याचे ठरले आहे.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी ही जनसुनावणी ही मॅरेथॉन बैठक झाली असे सांगितले. बैठकीत अनेक मुद्द्यांबाबत चर्चा झाली. स्थानिक शेतक-यांनी सांगितले की विकासाला आमचा विरोध नाही, मात्र जो मोबदला कमी प्रमाणात मिळाला, त्याबाबत पुढील निर्णय घेण्यात येऊन वाढीव मोबदला देण्यात यावा.

अध्यक्ष यांनी सांगितले की जमिनीचा मोबदला याबाबत मा. जिल्हाधिकारी यांच्यासोबत निश्चितपणे चर्चा करण्यात येऊन मार्ग काढण्यात येईल.

बैठकीत Bio-Diversity Act व त्याअनुषंगाने जिल्हास्तरीय समिती याबाबत चर्चा झाली. बैठकीत Bio-Diversity Act नुसार उपस्थित करण्यात आलेल्या सूचनांचा सुधारित ईआयए अहवालात अंतर्भाव करणे गरजेचे आहे. बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी यांचा समावेश बैठकीच्या इतिवृतात करण्यात येईल, त्याचप्रमाणे प्राप्त लेखी सूचना, आक्षेपासह प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

उपस्थितांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी त्यांच्या काही सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी असल्यास त्या लेखी किंवा तोंडी सादर करण्याचे आवाहन करण्यात आले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

आयोजक यांनी सागितले की बैठीकीत उपस्थित करण्यात आलेल्या सर्व सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी याची नोंद घेण्यात आलेली आहे. त्याचा इतिवृतात समावेश करुन ते इतिवृत अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह मा. अध्यक्षांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्यातर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल. तेथील तांत्रिक समिती स्थानिकांनी उपस्थित केलेल्या सर्व सूचनांचा विचार करणार आहे. या प्रकल्पास मान्यता देणे किंवा न देणे याबाबत समिती पुढील निर्णय घेत असते.

आयोजक यांनी सर्व उपस्थितांचे जनसुनावणीस राहून आपली मते, सूचना, आक्षेप नोंदविले याबद्दल आभार व्यक्त करुन मा. अध्यक्षा यांच्या वतीने जनसुनावणी ही संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी संस्थगित करण्यात आली.

**(निखिल मोरे)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जऩसुनावणी
समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ,
सोलापूर

**(प्रशांत गायकवाड)**
प्रतिनिधी
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
पुणे

**(दादासाहेब कांबळे)**
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर,
जिल्हा-सोलापूर